**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते  रेल्वेशी संबंधित विविध प्रकल्पांची दूरस्थ पद्धतीनं पायाभरणी आणि उद्घाटन

- परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर आणि अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जेक सुलिवान यांच्यात आज नवी दिल्लीत चर्चा

- गुरू गोविंदसिंह यांच्या जयंतीनिमित्त आज सर्वत्र प्रकाश पर्वाचे कार्यक्रम

- कर्नाटकात आढळले एचएमपीव्हीचे दोन रुग्ण

**आणि**

- उत्तर आणि पूर्व भारतात थंडीची लाट कायम

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी रेल्वेशी संबंधित विविध प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन आज दूरस्थ पद्धतीनं केली. काश्मीर ते कन्याकुमारी दळणवळण आणि पायाभूत सुविधा विकासाला चालना देणाऱ्या या प्रकल्पांमधे नव्या जम्मू रेल्वे विभागाचा समावेश आहे. तेलंगणातल्या नवीन चार्लापल्ली टर्मिनसचं उद्घाटन आणि पूर्व किनारपट्टी रेल्वेच्या रायगडा रेल्वे विभागाच्या इमारतीची पायाभरणी त्यांच्या हस्ते झाली पायभूत सुविधांच्या

माध्यमातून देश जोडला जात असल्याचं प्रधानमंत्र्यांनी भाषणात सांगितलं....

रेल्वे तसंच माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव, जम्मू काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा, तसंच मुख्यमंत्री ओमार अब्दुल्ला, तेलंगणचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी, ओदिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण माझी तसंच या दोन्ही राज्यांचे राज्यपाल इत्यादी मान्यवरांनी कार्यक्रमात व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून भाग घेतला.

वळणावळणाच्या सुविधा विकसित होत असल्याबद्दल या राज्यांचं प्रधानमंत्र्यांनी भाषणात अभिनंदन केलं.

**<><><><><>**

जागतिक स्तरावर चांगल्या आरोग्य आणि वैद्यकीय सुविधा देणारी आरोग्याची राजधानी होण्याची क्षमता भारताकडे आहे, मेक इन इंडियाच्या धर्तीवर, जग लवकरच हील इन इंडिया हा मंत्र स्वीकारेल असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. दिल्लीत, केंद्रीय आयुर्वेद संशोधन संस्थेच्या नव्या इमारतीची पायाभरणी प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या हस्ते काल दूरस्थ पद्धतीनं करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. देशातल्या प्रत्येक नागरिकापर्यंत आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यावर सरकारनं लक्ष केंद्रीत केलं असून, आयुष आणि आयुर्वेद यांच्या माध्यमातून पारंपरिक भारतीय उपचारपद्धतीला प्रोत्साहन देत असल्याचं मोदी यांनी यावेळी

सांगितलं. आयुष प्रणाली १०० हून अधिक देशांमध्ये पोहचली असून, जागतिक आरोग्य संघटनेची, पारंपरिक उपचारपद्धतीशी निगडीत पहिली संस्था भारतात स्थापन होत असल्याची माहितीही त्यांनी यावेळी दिली. आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव कार्यक्रमाला उपस्थित होते. केंद्रीय आयुर्वेद संस्थेचा परिसर तीन एकर क्षेत्रावर विकसित होत असून त्यावर १८५ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. पारंपरिक उपचारपद्धती आणि नाविन्याचा मेळ असलेली सर्वांगीण उपचारपद्धती तिथं उपलब्ध होणार आहे.

**<><><><><>**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज अर्थसंकल्पपूर्व चर्चेसाठी आठवी बैठक नवी दिल्लीत घेतली. आजच्या बैठकीत विविध संबंधित घटकांच्या प्रतिनिधींसह कामगार संघटनांचे प्रतिनिधी देखील सहभागी झाले होते.

**<><><><><>**

परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर आणि अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जेक सुलिवान यांच्यात आज नवी दिल्लीत बैठक झाली. यात द्विपक्षीय, प्रादेशिक आणि जागतिक सहकार्य अधिक दृढ करण्यावर चर्चा झाली. भारत-अमेरिका यांच्यात घनिष्ठ आणि मजबूत भागीदारी निर्माण करण्यासाठी सुलिवान यांच्या वैयक्तिक योगदानाचं जयशंकर यांनी समाज माध्यमावर

पोस्टमध्ये कौतुक केलं आहे. जेक सुलिवान आज नवी दिल्लीत राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल यांची भेट घेऊन चर्चा करणार आहेत.

**<><><><><>**

मराठी पत्रकारिता दिनानिमित्त आज सर्वत्र विविध कार्यक्रम होत आहेत. मराठी वृत्तपत्रसृष्टीचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांची जंयती आणि त्यांनी दर्पण हे पहिलं मराठी नियतकालिक सुरु केलं तो दिवस म्हणजेच ६ जानेवारी दरवर्षी मराठी पत्रकारिता दिन म्हणून साजरा केला जातो. मराठी पत्रकार संघानं काल मुंबईत महाराष्ट्राच्या पहिल्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स मीडिया हॅकॅथॉनचं आयोजन केलं होतं. राज्यपाल सी पी राधाकृष्णन यावेळी उपस्थित होते. पत्रकार संघटनेनं यावर्षीच्या पत्रकार दिनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता ही भविष्यवेधी संकल्पना निवडली आहे.

पत्रकार दिनानिमित्त महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आचार्य बाळशास्त्री जांभेकरांना आदरांजली वाहिली आहे.

**<><><><><>**

शिखांचे दहावे गुरू, गुरू गोविंदसिंह यांच्या जयंतीनिमित्त आज सर्वत्र प्रकाश पर्व साजरं करण्यात येत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गुरु गोविंद सिंह यांना आदरांजली अर्पण केली आहे. मानवतेच्या

कल्याणासाठी गुरु गोविंद सिंह यांनी केलेलं कार्य सर्वांना प्रेरणादायी असल्याचं राष्ट्रपतींनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

प्रकाश पर्वानिमित्त ठिकठिकाणच्या गुरुद्वारांमधे विशेष प्रार्थना आयोजित करण्यात आल्या आहेत. तसंच गुरु गोविंदसिंगाच्या प्रतिमांचे जुलूस निघाले आहेत. नांदेडच्या सचखंड गुरुद्वारातही प्रकाश पर्वानिमित्त भाविकांची गर्दी झाली आहे.

**<><><><><>**

कर्नाटकात ह्युमन मेटान्यूमो व्हायरस एचएमपीव्हीचे दोन रुग्ण आढळले आहेत. यात तीन महिन्यांच्या मुलीचा आणि आठ महिन्यांच्या मुलाचा समावेश आहे. दोघांवर उपचार सुरु असून बाधित रुग्णांपैकी एकानेही आंतरराष्ट्रीय प्रवास केलेला नाही. विविध देशांमध्ये एचएमपीव्हीशी संबंधित श्वसनाच्या आजाराचे रुग्ण सापडत आहेत. देशात इन्फ्लूएंझासदृश आजार किंवा गंभीर तीव्र श्वसन आजारात वाढ झालेली नाही. देशात श्वसनाच्या आजारांमध्ये होणारी संभाव्य वाढ हाताळण्यासाठी आरोग्य यंत्रणा सज्ज असल्याचं तसचं परिस्थितीवर लक्ष ठेवून असल्याचं केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं सांगितलं. चीनमध्ये एचएमपीव्हीच्या वाढत्या प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर जागतिक आरोग्य संघटना वेळोवेळी अद्ययावत माहिती देत आहे.

**<><><><><>**

जन सुराज पार्टीचे नेते आणि राजकीय विश्लेषक प्रशांत किशोर यांना आज पाटणा पोलिसांनी ताब्यात घेतलं. बिहार लोकसेवा आयोगाच्या भरती परीक्षेत पेपर फुटल्याचा आरोप करत ते उपोषण करीत होते. प्रशांत किशोर यांच्या समर्थकांनी या कारवाईविरोधात आंदोलन सुरु केलं आहे. किशोर यांना आज दुपारी न्यायालयात हजर केलं जाण्याची शक्यता आहे.

**<><><><><>**

श्रीलंकेत होणार असलेल्या दिव्यांग क्रिकेट करंडक स्पर्धेकरता भारतीय निवड समितीनं १७ खेळाडूंची निवड केली असून, संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी विक्रांत रवींद्र केणीवर सोपवली आहे. या स्पर्धेतला पहिला सामना येत्या १२ जानेवारीला भारत आणि पाकिस्तान या दोन संघात रंगणार असून अखेरचा सामना २१ जानेवारीला होणार आहे. दूरदर्शनवर या स्पर्धांचं थेट प्रक्षेपण केलं जाणार आहे.

**<><><><><>**

केरळच्या इडुक्की जिल्ह्यात पुल्लूपाडा इथं राज्य मार्ग परिवहन महामंडळाची बस चालकाचं नियंत्रण सुटल्यानं दरीत कोसळून अपघात झाला. यात दोन महिलांसह चौघांचा मृत्यू झाला आहे. जखमी झालेल्यांना मुंडक्कयम इथं रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. ब्रेक निकामी झाल्यानं हा अपघात झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. यात तामिळनाडूहून तंजावरच्या सहलीवरून परतत असलेले प्रवासी होते.

**<><><><><>**

अमेरिकेच्या कॅन्सस, मिसूरी आणि इंडियाना सारख्या राज्यांमध्ये हिमवादळाची शक्यता असून सुमारे ६ कोटी लोकसंख्येला या हिमवादळाचा तडाखा बसू शकेल असा इशारा अमेरिकेच्या नॅशनल वेदर सर्व्हिसनं दिला आहे. या हिमवादळामुळे ताशी ५० मैल वेगाने वारे वाहण्याची शक्यता लक्षात घेता या भागातून प्रवास करताना काळजी घ्यावी असा सल्ला हवामान विभागानं दिला आहे.

**<><><><><>**

उत्तर आणि पूर्व भारतात थंडीची लाट कायम असून तापमानात घट झाली आहे. दाट धुक्यामुळे दृश्यमानता कमी झाल्यामुळे रेल्वे आणि विमान उड्डाण उशीरानं होत आहेत. जम्मू काश्मीर मधे मध्यम ते जोरदार बर्फवृष्टी सुरु आहे. जोरदार बर्फवृष्टीमुळे जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्ग एनएच ४४ बंद करण्यात आला आहे तसचं श्रीनगर ते कारगिल आणि कारगिल ते झांस्कर रस्ता बंद आहे. कोलकाता विमानतळावर दृश्यमानता कमी असल्यानं सुमारे ६० विमान उड्डाणांना उशीर झाला. झारखंड मधे ७ ते १३ जानेवारी दरम्यान तर बिहार मधे ११ जानेवारीपर्यंत सर्व सरकारी आणि खासगी शाळा बंद राहणार आहेत. दिल्लीत आज सकाळी हलक्या पावसानं हजेरी लावली. हरियाणा आणि पंजाबमध्ये अनेक ठिकाणी थंडीचा कडाका कायम आहे. भारतीय हवामान विभागानं पंजाब, हरयाणा, चंदीगड, दिल्ली, उत्तर प्रदेश, राजस्थान, पश्चिम बंगाल, सिक्कीम, बिहार, झारखंड आणि

देशाच्या ईशान्य भागात पुढील दोन दिवस दाट धुक्याचा अंदाज व्यक्त केला आहे तर हिमाचल प्रदेश, उत्तराखंडमध्ये मेघगर्जनेसह मुसळधार पाऊस आणि बर्फवृष्टीचा अंदाज वर्तवला आहे.

//<><><><><>//